नि. फौ. ख. क्र.७३/२०२२ **निशाणी क्र.४२**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की,**

नाव – रेणुका लक्ष्मण शेंद्रे,

वय – ३० वर्षे, व्यवसाय – मजुरी

पत्ता – रा. परडी माटेगांव, ता. वडवणी, जि. बीड.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. ए. डी. साखरे यांचेमार्फत सरतपास दु.३.३५ वा. सुरुः**

१. घटना ही अंदाजे २–३ वर्षांपुर्वीची असून आमच्या घरासमोर सकाळी ७.३० वा. घडली होती. त्या दिवशी मी व माझे मालक आम्ही दसरा काढला होता/साफसफाई करीत होतो. आमच्या घरावरील पत्रे थोडे पाठीमागे गेल्यामुळे आरोपी नामे महेश याने माझे पती लक्ष्मण शेंद्रे यांना शिवीगाळ केली होती. त्यानंतर महेश यांनी त्यांच्या घरातुन हातोड आणला आणि माझे पती लक्ष्मण यांच्या डोक्यात मारला. मिनाबाई यांनी माझे पती लक्ष्मण यांचे हात धरले आणि ज्ञानोबा शेंद्रे यांनी माझ्या पतीच्या पाठीत दगड मारला. गोरख शेंद्रे आणि अशोक शेंडगे यांनी भांडण सोडविले, या दोन व्यक्तींनीच माझ्या पतीला अगोदर वडवणीच्या सरकारी दवाखान्यात आणले आणि त्या नंतर बीड च्या सरकारी दवाखान्यात नेले होते. त्यानंतर माझ्या पतीने माझ्या दिराला भांडण झाल्याचे सांगितले होते. माझे पती बीड च्या सरकारी दवाखान्यात भरती होते. त्यानंतर माझ्या पतीने काय केले हे मला आठवत नाही.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. टी. ए. शेख यांच्यामार्फत**

२. मी माझ्या पतीचे ऐकते. हे म्हणणे खरे नाही की, दसरा काढला त्यावेळी सर्व साहित्य आमच्या घराच्या बाजुच्या बोळीमध्ये ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की, अशोक शेंडगे हे आमचे पाहुणे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गोरख शेंद्रे हे आमचे भावकीतील आहेत. पोलीस माझ्या घरी जबाब नोंदविण्यासाठी आले होते परंतु ती तारीख/वार मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरासमोर ओट्या सारखी एक भिंत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती गडबडीने घरात जात असताना ती ओट्या सारखी माझ्या पतीच्या डोक्याला लागली आहे. हे म्हणणे खरे नाही की, रमेश चव्हाण माझ्या मालकाचा मित्र आहे.

३. पोलीसांनी माझा जबाब आमच्या गावात नोंदविला होता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देणे, जबाब देणे या बाबी माझ्या मालकानेच केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या घरासोबत सदर घटनेच्या पुर्वी पासून आमचे बोलणे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी आम्ही दसरा काढला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, महेशने माझ्या पतीच्या डोक्यात हातोडा मारला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मिनाबाई यांनी माझ्या पतीचे हात धरले आणि ज्ञानोबा यांनी पाठीत दगड हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोरख शेंद्रे आणि अशोक शेंडगे यांचे घर आमच्या घरापासून ब–याच अंतरावर आहे.  हे म्हणणे खरे नाही गोरख आणि अशोक यांनी भांडण सोडविले हे मी खोटे सांगितले आहे.

४. माझ्या पतीच्या डोक्यात हातोडा मारला असल्यामुळे त्यांना दवाखान्यात जाऊन भेटावे असे मला पहिल्याच दिवशी वाटले होते. हे म्हणणे खरे आहे की, वडवणी ते बीड जाणे–येणे साठी गाड्यांची सुविधा उपलब्ध आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मी सांगते अशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही माझा जबाब माझ्या मालकांनीच तयार करुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासाच्या वेळी कथन केलेल्या सर्व बाबी खोटया सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती लक्ष्मण विक्रम शेंद्रे यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास दु.३.५७ वा. पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०४/०२/२०२६**

**समक्ष**

sd/–

**(विष्णु द. गिते)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
वडवणी, जि. बीड.

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

sd/–

**(विष्णु द. गिते)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
वडवणी, जि. बीड.